# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ४११ ००४

## * प्रकटन*

**विषय :-** बोगस परीक्षा मंडळापासून होणारी फसवणूक थांबविण्याबाबत.

मंडळ नियमावलीतील तरतुदी, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२ यांच्या शासन निर्णय क्रमांक : एसएससी २००५/(१४९ /०५)/उमाशि २ दिनांक : २० जून, २००५ अन्वये मंडळामार्फत इयत्ता १० वी, इयत्ता ११ वी ची समकक्षता अनुक्रमे इयत्ता ११ वी व १२ वी च्या प्रवेशाची पात्रता निश्चित करण्यात येते.

भारतातील व भारताबाहेरील विविध शिक्षण मंडळे शिक्षणसंस्था व विभागीय मंडळांकडून प्राप्त झालेल्या व राज्य मंडळाने समकक्षता मान्य केलेल्या शिक्षण संस्था/शिक्षण मंडळाचे नाव राज्य मंडळाच्या मान्यताप्राप्त समकक्षता यादीमध्ये समाविष्ट करताना मंडळाच्या समकक्षता समितीचे अभिप्राय व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडख विनियम १९७७ मधील क्र.७९ कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देण्यासाठीची पात्रता मधील निकषांच्या आधारे मंडळामार्फत समकक्षतेविषयी निर्णय घेण्यात येतो.

संबंधित परीक्षा मंडळाची वैधता, शासन मान्यता, पाठ्यक्रमाची तुलना, परीक्षा पध्दती, विषययोजना, उत्तीर्णतेचे निकष, विषय निवड इत्यादी बाबतचे साक्षांकित पुरावे संबंधितांकडून मागवून व ते अभ्यासून सदर समिती मान्यतेविषयी शिफारस करते किंवा सबळ कारणानी शिफारस करणे नाकारते. समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे, कार्यालयामार्फत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार संबंधित शिक्षण संस्था / शिक्षण मंडळाचे नाव मंडळाच्या मान्यताप्राप्त समकक्षता यादीमध्ये समाविष्ट करण्यात येते. अशाच संस्था / बोर्डांना मंडळामार्फत समकक्षता प्रदान करण्यात येते. सदर समकक्ष मंडळांची यादी मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येते. सदर समकक्षता प्राप्त शिक्षण संस्था/बोर्डांच्या विहित परीक्षांव्यतिरिक्त या मंडळाची समकक्ष नसलेल्या इतर संस्था/बोर्डांच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या मंडळाशी संलग्न माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता १० वी, ११ वी/इयत्ता १२ वी च्या परीक्षेस पात्र होणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सचिव,
महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे – ४११ ००४

E.D.P. INWARD
No. 1309
Date 8/9/16

ENVISION/D:/Meena/Sadar 4/107